पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

मुखपृष्ठ
विजय सैंदाणे

व्यवस्थापक - लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

# मधमाश्यांच्या सहवासातले आनंददायी ‘ॲपी टुरिझम’



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : ‘पूर्वा कृषिदूत’)
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- मधमाशी म्हणजे सजीव सृष्टीला लाभलेले वरदान
- मानवाचा अन्नप्रपंच मधमाशीमुळेच सुरळित चालतो
- भारतामध्ये मधमाशी पालनाचा व्यापक प्रसार गरजेचा
- ‘बसवंत मधमाशी उद्याना’ची या संदर्भात लक्षणीय कामगिरी
- मधमाशी केंद्रस्थानी असलेले हे उद्यान ठरले गौरवाचे धनी
- राज्यासह देशभरात अशी ‘मधुक्रांती’ जोमाने व्हावी सुरू

मधमाशी म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेले वरदान. अनंत काळापासून निसर्गाने मधमाशीचे जतन केले, तिचे संवर्धन केले कारण निसर्गाला माहीत आहे की, मधमाशी टिकली तरच निसर्गातील इतर जीवसृष्टीचे जतन होईल. त्यामुळेच थोर शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांनी म्हटले होते की, या पृथ्वीतलावरून ज्यावेळी मधमाशी नामशेष होईल; त्यावेळी येथील इतर जीवसृष्टी विशेषत: मानवाला नामशेष होण्यासाठी फक्त चारच वर्षांचा कालावधी लागेल! अर्थात हे आम्ही अनेकदा वाचले- ऐकले आहे. परंतु आमच्यामध्ये त्यादृष्टीने मात्र बदल होत नाही. मधमाशीचा फुलांना होणारा स्पर्श म्हणजे परीसस्पर्श. कारण या परीसस्पर्शामुळेच फुलांचे रुपांतर फळांत- अन्नधान्यांत होते, ज्याच्यावर मानव आणि इतर प्राणिमात्र अवलंबून आहेत.

## ‘स्लोव्हेनिया’तील आदर्श मधुप्रकल्प

जगातील एकूण वनस्पतींपैकी तसेच पीक उत्पादनांपैकी ८० टक्के पिके-झाडे यांचे मधमाशीच्या सहाय्याने परागीभवन होऊन उत्पादन मिळत असते. मधमाशी नाही तर परागीभवन नाही, पीक उत्पादन नाही, वनस्पतीचे प्रजनन नाही, तिची पुढची पिढी नाही! म्हणूनच मधमाशी हे निसर्गाने मानवाला दिलेले एक वरदान आहे, असे म्हटले जाते. मधमाशीला हजारो वर्षांचा इतिहास असला तरी, मागील तीन-चार शतकांपासून मधमाशीचे शास्त्रोक्त

पद्धतीने पालन करून तिचा मानवी कल्याणासाठी वापर करण्यावर मोठे काम झाले. जगातील अनेक देशांमध्ये या विषयावर काम झाले. विशेषत: युरोप खंडातील स्लोव्हेनिया या छोट्या देशामध्ये शास्त्रोक्त पद्धतीने मधमाशी पालन या विषयावर मोठ्या प्रमाणात काम झाले. सन १७३४ ते १७७३ या दरम्यान ॲन्टान जोन्सा यांनी मधमाशी पालन तंत्राचे आधुनिकीकरणात रुपांतर केले. ॲन्टान जोन्सा यांना शास्त्रोक्त आणि आधुनिक मधमाशी पालनाचे शिल्पकार म्हटले तर वावगे होणार नाही. यामुळेच ॲन्टान जोन्सा यांचा वाढदिवस- म्हणजेच २० मे हा 'जागतिक मधमाशी दिन' म्हणून साजरा केला जातो. स्लोव्हेनिया देशामध्ये मागील तीन शतकांमध्ये झालेल्या कामामुळेच आजही युरोप खंडातील या देशाकडे मधमाशी पालनाच्या संदर्भात आदराने बघितले जाते. या देशामध्ये मधमाशीचे संवर्धन करण्यासाठी अनेक उपाययोजना आणि कडक धोरणे राबविली जातात. या छोट्याशा देशात ९,६०० मधपाळ, १२,५०० मधुबने आणि १ लाख ७० हजार मधमाश्यांच्या वसाहती आहेत. समाजामध्ये मधमाशीचे महत्त्व पटवून सांगण्यासाठी या देशात अनेक प्रकारचे उपक्रम राबविले जातात. याचमुळे हा देश जगातील पहिला 'ॲपी टुरिझम कंट्री' म्हणून गणला जातो. मधमाशीचा प्रचार- प्रसार होण्यासाठी मधमाशीला केंद्रस्थानी ठेवून अनेक प्रकारची टुरिझम केंद्रे या देशात उभी राहिलेली आहेत. मधमाशीच्या सान्निध्यात राहणे, मधमाशीचे कार्य जवळून बघणे, मधमाशीच्या विविध जातींचे निरीक्षण करणे, मधमाशीचे विविध प्रकार ओळखणे, मधमाशीच्या वसाहती हाताळणे, मधमाशीला आवडणाऱ्या विविध वनस्पतींचे निरीक्षण करणे, मधमाशीपासून तयार होणाऱ्या विविध पदार्थांची माहिती घेऊन त्यांचा आस्वाद घेणे, मधाचे विविध प्रकार बघून त्यांची चव घेणे यासारख्या बाबींचा अनुभव पर्यटकांना येथील अनेक ॲपी टुरिझम सेंटर्समध्ये घेता येतो. मधाचा मसाज, स्पा, ॲपिथेरपी या प्रकारच्या आरोग्यदायी थेरपींबरोबरच मधमाश्यांच्या सान्निध्यात मुक्काम करण्यासाठी अनेक निवासी स्वरुपाची पर्यटन केंद्रेही येथे सुरु झाली. या सर्व प्रयत्नांमुळे तेथे ठिकठिकाणी एक तर नाविन्यपूर्ण- अनोखे असे पर्यटन केंद्र सुरू झालेच परंतु त्याचबरोबर मधमाशीचे संवर्धन करण्यासाठी उपयुक्त असलेले प्रचार- प्रसार केंद्रही सुरू झाले. आज अनेक देशांमध्ये ॲपी टुरिझम ही संकल्पना साकार झालेली आहे तर काही देशांमध्ये यावर काम सुरू झाले आहे.

## भारतात मधमाशी पालन तुलनेने दुर्लक्षित

भारताचा विचार केला तर आपण मधमाशी पालनामध्ये फारच मागे आहोत. ब्रिटिशांच्या काळात म्हणजे १८८४ मध्ये पहिल्यांदा बंगालमध्ये मधमाश्यांच्या पेटीमध्ये शास्त्रोक्त पद्धतीने मधमाशी पालनाचा प्रयोग झाला. १९२८ मध्ये रॉयल कमिशनने मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५४ मध्ये खादी ग्रामोद्योग विभागाची स्थापना करून त्यांच्या माध्यमातून मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न झाला.

खरं तर शेती उत्पादन आणि मधमाशी पालन यांचा जवळचा संबंध- म्हणजेच या एकाच नाण्याच्या दोन बाजू. परंतु दुर्दैवाने २०१८ पर्यंत कृषी विभाग आणि मधमाशी पालन यांचा संपर्क कधीच आला नाही. मागील चार वर्षांपूर्वी केंद्र शासनाने निर्णय घेऊन हा विषय कृषी विभागाच्या अंतर्गत घेतला आहे. परंतु मागील चार वर्षांत मधमाशी पालन हा विषय कृषी विभाग, कृषी विद्यापीठे यांच्या माध्यमातून कासवाच्या गतीनेच सुरू आहे. आजपर्यंत जे काही थोडेफार काम झाले ते खादी ग्रामोद्योग विभागाच्या तसेच मधपाळांनी पुढाकार घेतल्यामुळे झाले आहे. मधमाशी पालन या विषयाबद्दल आजही समाजामध्ये फारच अनभिज्ञता आहे. याबद्दलची माहिती अत्यंत त्रोटक किंवा अर्धवट आहे. मागील दशकात मधाचे वार्षिक उत्पादन दुप्पट म्हणजेच एक लाख तीस हजार टनांपर्यंत वाढले आणि निर्यातही ५५-६० हजार टनांपर्यंत गेली आहे. परंतु हे पुरेसे नाही. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये मधमाशी पालनाला फार मोठी संधी आहे- कारण देशातील ५ कोटी हेक्टर पिकांचा फुलोरा मधमाशी पालनासाठी उपयुक्त आहे.

## बसवंत मधमाशी उद्यानाची लक्षणीय कामगिरी

आज आपल्या देशभरात मधमाश्यांच्या ३६ लाख वसाहती आहेत, ज्यांची संख्या २०० लाखांपर्यंत सहज वाढविता येईल. देशामध्ये मधाचे उत्पादन ७ लाख टनांपर्यंत वाढविता येईल. यातून २ ते ३ लाख लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येईल. तसेच शेतीच्या उत्पादनामध्ये २० ते २५ टक्के वाढ साध्य करता येईल. अर्थात यासाठी मधमाशी

पालनाबद्दल समाजामध्ये मोठ्या प्रमाणात प्रबोधन करावे लागेल. मधमाशी पालनाचा प्रचार- प्रसार करावा लागेल. मधमाशी पालनासाठी आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करावे लागेल. याचाच विचार करून 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'- नाशिक या कंपनीचे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी २०१९ मध्ये पिंपळगाव बसवंत, तालुका निफाड, जिल्हा नाशिक येथे 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'ची स्थापना केली. सुरुवातीला अत्यंत छोट्या स्वरुपात सुरू केलेल्या या केंद्रामध्ये सातत्याने सुधारणा आणि मूल्यवर्धन करीत आज देशातील पहिल्या आणि अनोख्या अशा ॲपी टुरिझम सेंटरमध्ये याचे रुपांतर झाले आहे. येथे भेटी देणाऱ्या पर्यटकांना मधमाशीबद्दल सखोल माहिती देण्यासाठी बसवंत मधमाशी उद्यान, आदर्श गाव- सेवरगांव, ग्रामसंस्कृती केंद्र, फळे- भाजीपाला व मध प्रक्रिया युनिट, फूड कोर्ट यांबरोबरच पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी काही खेळ आणि करमणुकीच्या साधनांची निर्मिती बसवंत ॲपी टुरिझम सेंटरमध्ये केली आहे. मधमाशीचे महत्त्व आणि इतिहास, मधमाश्यांचे विविध प्रकार, जाती, मधमाश्यांचे जीवनचक्र आणि जीवनशैली, मधमाश्यांपासून मिळणारे विविध पदार्थ, मधमाशीसाठी उपयुक्त झाडांची नर्सरी, मधमाशी हाताळण्यासाठी ॲपिअरी, मधमाश्यांचे गाव- मधमाश्यांचे शहर यांची मिनिएचर्स, आग्या मोहोळापासून मधाची शास्त्रोक्त पद्धतीने काढणी, मधमाशी पालनावर शाळेतील मुलांसाठी घेतलेल्या चित्रकलेच्या स्पर्धांतील उत्तम चित्रांचे प्रदर्शन, मधमाशीवर चित्रफीत आणि वातानुकुलित हॉलमध्ये बी मूव्ही बघण्यासाठीची वेगळी सोय, मधमाशी पालनासाठी शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षणाची सोय येथे करण्यात आली आहे.

## मधु- पर्यटनातून आनंद आणि प्रबोधनही

बसवंत मधमाशी पार्कमध्ये फिरत असताना मधमाश्यांचा जवळून परिचय होतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे येथे आल्यानंतर सेल्फी काढण्याचा मोह नक्कीच होतो. यासाठी तयार केलेला सर्वात मोठा सेल्फी पॉईंट- म्हणजेच मधमाशीच्या मोठ्या प्रतिकृतीसोबत ग्रुप फोटो काढण्याची सोय उपलब्ध केली आहे. ॲपी टुरिझम सेंटरमध्ये आपल्या जिभेचा आणि पोटाचा देखील विचार करण्यात आलेला आहे. विविध प्रकारच्या मधांची चव चाखण्याबरोबरच मधापासून बनविलेल्या विविध पदार्थांचा आस्वाद येथे घेता येतो. तसेच स्वादिष्ट भोजन, चहा- नाश्ता यांची रेलचेल असलेलं फूडकोर्ट उभारलेलं आहे. आपल्या पारंपरिक खेळांबरोबरच अनेक प्रकारच्या नवीन खेळांचा आनंदही बसवंत गार्डनमध्ये घेता येतो. कुटुंबातील लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांचा विचार करून; पूर्ण दिवसभर त्यांचा प्रत्येक क्षण बसवंत गार्डनमध्ये कशा प्रकारे आनंदात जाईल याचा अत्यंत बारकाईने विचार करूनच बसवंत गार्डनची रचना आणि उभारणी केली आहे. बसवंत ॲपी टुरिझम सेंटरमध्ये आल्यानंतर प्रत्येक जण नक्कीच मधमाशीच्या प्रेमात पडतो. बसवंत गार्डनच्या या नियोजनाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत हजारो पर्यटकांनी या सेंटरला भेटी देऊन आयुष्यातील एक दिवस मधमाशीसोबत राहून अपार आनंद मिळवला आहे. बसवंत गार्डनने मागील तीन वर्षांपासून मधमाशी पालनाचा प्रसार करण्यासाठी केलेल्या या प्रयत्नांचे फळ म्हणजे- सप्टेंबर २०२२ मध्ये 'इंटरनॅशनल सेंटर फॉर रिस्पॉन्सिबल टुरिझम' या जागतिक स्तरावरील संस्थेने; नैसर्गिक वारसा आणि जैवविविधतेच्या संवर्धनामध्ये पर्यटनाच्या योगदानाबद्दल केंद्राचा रौप्यपदक देऊन सन्मान केला. बसवंत ॲपी टुरिझम सेंटर हे देशातील या प्रकारचे एकमेव आणि अनोखे मधुमक्षिका केंद्र आहे. मधमाशीचे संवर्धन करण्याचे काम करत असतानाच, टुरिझमसाठी मधमाशी पालन प्रकल्पाचा उपयोग करण्याचा यशस्वी प्रयत्न या केंद्राच्या माध्यमातून देशामध्ये पहिल्यांदाच झाला आहे. या अनोख्या ॲपी टुरिझम सेंटरला भेट देऊन, मधमाशी पालन व्यवसायाचा विकास करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले, तर नक्कीच देशामध्ये अल्प कालावधीत 'मधुक्रांती' होईल यात शंका नाही. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय भास्कर पवार यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.
संपादक : डॉ. भास्कर गायकवाड.
* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.